पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००
E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in

---

**प्रेसनोट** दिनांक : २१/०७/२०२३

# पोहाणे गावात (०९) वर्षीय मुलाचा गळा कापून खून
# शेतात गाडून ठेवलेले प्रेत काढण्यासाठी प्रशासनाकडून उत्खनन

---

दिनांक १६/०७/२०२३ रोजी वडनेर खाकुर्डी पोलीस ठाणे हद्दीतील पोहाणे, ता. मालेगाव येथील रहिवासी श्री. अनिल फुलसिंग सोनवणे यांचा ०९ वर्षांचा मुलगा नामे कृष्णा अनिल सोनवणे हा शेतात खेळण्यासाठी गेला असता तो पुन्हा घरी परतला नाही, त्याचा शोध घेतला असता तो मिळून न आल्याने त्यास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी फुस लावून पळवून नेले बाबत वडनेर खाकुर्डी पोलीस ठाणे येथे गुरनं २२४/२०२३ भादवि ३६३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. यातील बेपत्ता मुलाचे वर्णनावरून सदर गुन्हयाचा तपास सुरू करण्यात आला होता.

दरम्यान दिनांक १८/०७/२०२३ रोजी पोहाणे गावचे शिवारात मांजरी नाला परिसरातील शेतात दुर्गंधीयुक्त वास येत असल्याने सदर ठिकाणी पोलीस पथकांनी मा. तहसिलदार मालेगाव यांचेसह जावून चौकशी केली असता, त्याठिकाणी एका खड्डयात पालथे परिस्थीतीत अर्धवट पुरलेले प्रेत आढळून आले. वर्णनावरून प्रेताची खात्री केली असता, सदरचे प्रेत हे वरील गुन्हयातील बेपत्ता मुलगा नामे कृष्णा अनिल सोनवणे याचे असल्याचे निष्पन्न झाले. मयत मुलास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी गळयावर कोणत्यातरी हत्याराने कापून, जिवे ठार मारून पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने प्रेत हे खड्डयात पुरल्याचे आढळून आल्याने सदर गुन्हयास भादवि कलम ३०२,२०१ प्रमाणे वाढीव कलम लावण्यात आले आहे. यातील मयत मुलाचे प्रेत हे उत्तरीय तपासणीसाठी धुळे जिल्हा रुग्णालय येथे पाठविण्यात आले होते. उत्तरीय तपासणीनंतर आज दुपारी पोहाणे गावांत मयत मुलावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती, उपविभागीय पोलीस अधिकारी मालेगाव ग्रामीण विभाग श्री. पुष्कराज सुर्यवंशी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. हेमंत पाटील, वडनेर खाकुर्डी पोलीस ठाण्याचे सपोनि श्री. मनोज पवार असे कालपासून पोहाणे परिसरात वरील घटनेचा तपास करत आहेत. सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीचा कसोशिने शोध घेण्यासाठी घटनास्थळी श्वान पथक, फिंगरप्रिंट पथक तसेच फॉरेन्सिक टीमला पाचारण करण्यात आले आहे. तसेच तपासकामी एकुण ०५ पथके नेमण्यात आली असून यातील घटनेप्रमाणे आरोपीचा कसोशिने शोध सुरू आहे. सदर गुन्हयाचा तपास वडनेर खाकुर्डी पोलीस ठाण्याचे सपोनि श्री. मनोज पवार हे करीत आहे.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून आज रोजी नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी घटनास्थळी भेट दिली व तपास पथकांना गुन्हा उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सूचना दिल्या आहेत.